अभियांत्रिकी विषयक विभागातील
कामकाजाची पध्दती अधिक सुलभ
व सुटसुटीत करण्यासाठी अभ्यास
समिती स्थापन करणेबाबत..

# <u>जिल्हा परिषद अमरावती</u>

क्रमांक जिप/मुकाअ/स्विस/२४८/17
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक 13 जानेवारी, 2017

<u>प्रस्तावना</u>

जि.प. विभागातंर्गत लेखाविषयक, तांत्रिक शाखा आणि आस्थापना विषयक शाखेची आकस्मिक दप्तर तपासणी अधिकारी-पथकामार्फत करण्यासाठी या कार्यालयाकडून क्रमांक जिप/मुकाअ/स्विस/246/17 दिनांक 12.1.2017 चे आदेशानुसार सर्व विभागांचा तपासणीचा कालबध्द कार्यक्रम तयार करुन देण्यात आलेला आहे. त्यानुसार, दिनांक 13.1.2017 रोजी बांधकाम विभागाची आकस्मिक तपासणी करण्यात आली. सदर तपासणीच्या अनुषंगाने प्रामुख्यांने काही त्रूटया लक्षात आलेल्या आहेत. अमरावती जिल्हा परिषदेकडे बांधकाम विभाग, लघुसिंचन विभाग आणि ग्रामीण पाणी विभाग असे तिन अभियांत्रिकी विषयक कामकाज हाताळणारे विभाग आहेत. सदर विभागांमार्फत अभियांत्रिकी विषयक कामकाज हाताळतांना विभाग निहाय भिन्न कार्यपध्दती अंवलबविल्या जात आहे. सदर कामात एकसूत्रता आणण्याचा प्रयत्न सर्वप्रथम सन 2007-08 मध्ये जिल्हा परिषद आय.एस.ओ. मानांकन करतेवेळी झालेला आहे. तिन विभागातील कामांच्या कार्यपध्दतील सादरीकरणाचे टप्पे, विविध महत्वाच्या नोंदवहयांसाठी संगणकाचा [वापर] करुन परिणामकारक कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी कार्यकारी अभियंता यांचे अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमण्याची बाब विचाराधीन होती. त्यासाठी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

दिनांक 13.1.2017 रोजी बांधकाम विभागाची आकस्मिक तपासणी करण्यात आली. सदर तपासणीच्या अनुषंगाने प्रामुख्यांने काही त्रूटया लक्षात आलेल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे-

1. आवश्यक नोंदवहयामध्ये उलट संदर्भ (cross references) नाहीत.
2. नोंदवहयासाठी संगणकाचा वापर केल्या जात नाही.
3. सर्व साधारण सभेच्या मंजुरीपासून प्रत्यक्ष कार्यारंभ आदेश देण्यापर्यतच्या कार्यपध्दतीचे टप्पे व क्रम याबाबत स्पष्टता नाही.
4. बहुतांश काम व्यक्तीकेंद्रीत झालेले दिसते.
5. फाईल्स आणि रेकॉर्ड व्यवस्थितरित्या ठेवलेले नसल्याने आवश्यक ते कागदपत्रे सापडण्यास अडचणी येत आहेत. त्यासाठीचे संबंधित शासन निर्णय आणि शासन निर्देशाबाबतची माहिती कर्मचा-यांना नाही.

6. नियमबाह्य पध्दतीने होत असलेले काम संबंधित कार्यपध्दतीच्या कोणत्या टप्पावर कशा पध्दतीने रोखता येत, याबाबत स्पष्टता नाही.

7. चुकीचे कामकाज टाळण्यासाठी प्रतिबधात्मक काय उपाय योजता येतील याबाबतचा विचार होणे आवश्यक दिसते.

वरीलत्रुटया लक्षात घेता अमरावती जिल्हा परिषदेतंर्गत बांधकाम विभाग, लघुसिंचन विभाग आणि ग्रामीण पाणी विभाग अशा विभागातील कार्यपध्दतीचा अभ्यास करुन शासन निर्देशाप्रमाणे व संगणकाचा वापर करुन परिणामकारक कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक आहे. तिनही विभागातील कामकाजाचा अभ्यास, सद्यस्थिती, कार्यपध्दती, कर्मचा-यांची मानसिक पातळी, अपेक्षीत कार्यपध्दती इ.बाबीचा विचार करावा लागेल. या सर्व घटकांची माहिती घेताना निविदा शाखा, आस्थापना शाखा, तांत्रिक शाखा, भांडार शाखा आणि लेखा शाखा, परिषद शाखा इ. शाखांचा सांगोपांग विचार करुन कार्यपध्दती ठरविण्यासाठी पुढील प्रमाणे अभ्यास समिती नेमण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिका-यांचे नांव व पदनाम | जबाबदारी |
|---|---|---|
| 1 | श्री. प्रमोद तलवारे, कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग जि.प. अमरावती | समिती अध्यक्ष |
| 2 | श्री. किरण ठाकरे, उप अभियंता, बांधकाम उपविभाग दर्यापूर | सदस्य |
| 3 | श्री. संदीप देशमुख, उप अभियंता, जि.प. ग्रा.पा.पु. उप विभाग मोर्शी. | सदस्य |
| 4 | श्री. ओ. आर. वर्मा, उप कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग, जि.प. अम. | सदस्य |
| 5 | श्री. मनिष गिरी, स.ले.अ. वित्त विभाग | सदस्य |
| 6 | श्री. विकल मेहरा, क.ले.अ. पं.स. अचलपूर | सदस्य |
| 7 | श्री. अविनाश हूसे, क.प्र.अ. प.स. वरुड | सदस्य |
| 8 | श्री. स्वप्नील कु-हेकर, व.स. बांधकाम विभाग | सदस्य |
| 9 | श्री.संजय उमक, शाखा अभियंता, लघुसिंचन विभाग, जि.प. अमरावती | सदस्य सचिव |

वरील समितीने विदयामान परिस्थितीचा पुर्ण अभ्यास करुन प्रस्तावित सुधारणांचा अहवाल दिनांक 1 मार्च 2017 रोजी सादर करावा.

KSK

(डॉ.किरण कुलकर्णी,भाप्रसे )
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद,अमरावती

प्रत - सर्व संबंधित.

१. सर्व खाते प्रमुख जिल्हा परिषद अमरावती.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सर्व.
३. उप अभियंता,-------------- उप विभाग,------- सर्व.
४. ................................ यांना आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना.